**Tapti Education Society's**

# BHUSAWAL ARTS, SCIENCE AND P. O. NAHATA COMMERCE COLLEGE, BHUSAWAL.

Affiliation :North Maharashtra University, Jalgaon
NAAC Re-accredited : Grade 'A' (CGPA:3.30)
A Status by UGC : College with Potential for Excellence.(CPE)

## VISION

*"Achieving the Excellence in Higher Education For Nation Building"*

## MISSION

*" Commitment to Excellence in Higher Education, to Empower Youth with Modern Views, Foresight, Global Competency along with Social Commitment For Nation Building"*

## GOAL & OBJECTIVES

The Tapti Education Society & College working with motto '**Vidya Danaam Mahat Punyam'**, to achieve following Goal & objectives

1) To impart, promote and spread quality based higher education.
2) To develop sense of responsibility and Social Commitment among the youth.
3) To broaden the vision so the youth so they have panoramic view of the society.
4) To create human resources with modern view and foresight for the development of the Nation.
5) To promote the research activities.

# प्रस्तावना

**प्रिय विद्यार्थ्यांनो,**

भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात आपले स्वागत आहे. उत्तरोत्तर प्रगतीचे चक्र पुढे पुढे नेणाऱ्या आमच्या या मोठ्या कुटुंबात सहभागी होण्याच्या निर्णयाबद्दल आपले अभिनंदन. आपल्या महत्त्वपूर्ण सहयोगाने प्रगतीचे हे चक्र आणखी गतिमान होऊन महाविद्यालय अतिउत्कृष्टतेच्या दिशेने जात राहील याची खात्री आहे.

महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. हे पदवीपर्यंतचे पाठ्यक्रम तसेच एम.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. हे पदव्युत्तर पाठ्यक्रम चालविले जातात. बी.एस्सी. व एम्.एस्सी. कॉम्प्युटर या अभ्यासक्रमाबरोबरच व्यावसायिकतेवर आधारीत बी.एस्सी. आय.टी./बायोटेक/मायक्रो बॉयोलॉजी., बी.बी.ए., बी.एम.एस. (ई–कॉमर्स) आणि बी.सी.ए. हे पाठ्यक्रम ही चालविले जातात. तसेच संगीत विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झालेला आहे. एम.एस्सी., आय.टी., बायोलॉजी, मायक्रोबायोलॉजी, इतिहास, राज्यशास्त्र हे अभ्यासक्रम सुरु होणार आहेत. महाविद्यालयात रसायनशास्त्र, अर्थशास्त्र आणि वाणिज्य, हिंदी, मराठी,इंग्रजी, वनस्पतीशास्त्र या विषयांसाठी संशोधन केंद्र आहेत.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच महाविद्यालयात हे प्रोत्साहन, स्फूर्ती, प्रेरणा, समर्पितता, स्नेह, आपुलकीचे भांडारच आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी व सर्वांगीण विकासासाठी सर्वजण सांघिक स्वरुपात कार्य करीत असतात.

आपणास ही प्रवेश पुस्तिका काळजीपूर्वक वाचल्यावर बरीचशी माहिती मिळेल असा विश्वास आहे.

आपणा सर्वांना महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष समाधानकारक व सफलतापूर्वक जावो अशी हार्दिक शुभेच्छा.

**प्राचार्य**

# अनुक्रमणिका


| | | पेज नं. |
|---|---|---|
| १) | ताप्ती एज्युकेशन सोसायटी संचलित विविध शैक्षणिक संस्था | ५ |
| २) | महाविद्यालयातील विविध सुविधा | ७ |
| ३) | अभ्यासक्रम प्रवेश | १४ |
| ४) | अभ्यासक्रम व विषय | १८ |
| ५) | विविध अभ्यासक्रम शुल्क | ३१ |
| ६) | विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधीचे नियम | ३९ |
| ७) | ग्रंथालय माहिती व नियम | ४१ |
| ८) | सत्र मंजूरीसाठी नियम | ४२ |
| ९) | परीक्षा नियम | ४२ |
| १०) | पारितोषिके | ४४ |
| ११) | महाविद्यालयातील शिक्षकवृंद | ४७ |

## १. ताप्ती एज्युकेशन सोसायटी संचलित विविध शैक्षणिक संस्था

भुसावळ शहराच्या परिसरातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या उच्च शिक्षणाची संधी मिळावी व परिसरातील शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ताप्ती एज्युकेशन सोसायटी, भुसावळ ही संस्था १९५८ मध्ये स्थापन झाली. ताप्ती एज्युकेशन सोसायटी संचलित विविध शैक्षणिक उपक्रम–

### १) भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ

ताप्ती एज्युकेशन सोसायटी, भुसावळ ह्या संस्थेद्वारा जून १९६३ पासून कला आणि वाणिज्य महाविद्यालय सुरु करण्यात आले. महाविद्यालयास कै.पुनमचंद ओंकारदास नाहाटा यांनी रुपये ५१,००१/– ची देणगी दिली. त्यानंतर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागास श्री. पुनमचंद ओंकारदास नाहाटा यांचे नाव देण्यात आले. १९७२ पासून महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखा सुरु करण्यात आली. हे महाविद्यालय उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न आहे. महाविद्यालयात अकरावी पासून एम.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी पर्यंत शिक्षण दिले जाते. व्यवस्थापन शास्त्रातील बी.बी.ए. ही पदवी अभ्यासक्रम व बी.एम.एस. (ई–कॉमर्स) हा पदवी अभ्यासक्रम तसेच बी.एस्सी./आय.टी./बायोटेक/बी.सी.ए. हे अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. एम्.एस्सी., योगीक सायन्स, फॉरेन लँग्वेज हे अभ्यासक्रम सुरू होत आहेत. एम.फिल व पीएच.डी. चे मार्गदर्शनाचे कामही चालते.

**संलग्नता – विद्यापीठ व यु.सी.जी. :**

१९६३ पासून स्थापन झालेल्या या महाविद्यालयास सुरुवातीस पुणे विद्यापीठाचे संलग्नीकरण होते. तसेच हे महाविद्यालय उच्च शैक्षणिक दर्जाचे सर्व निकषपूर्ण करीत असल्यामुळे पुणे विद्यापीठाने १९७९ पासून कायम संलग्नीकरण दिलेले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग कायदा १९५६ च्या कलम २ (एफ्) खाली ऑगष्ट १९७२ मध्ये या महाविद्यालयाची नोंदणी झालेली असल्यामुळे कलम १२ बी खाली नोंदणीची आवश्यकता नाही. हे महाविद्यालय यु.जी.सी. व केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचेकडून मिळणाऱ्या सर्व अनुदानास पात्र आहे. जून १९८९ पासून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडे संलग्नीकरण हस्तांतरीत झालेले आहे. शिवाय नियमानुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे संलग्नीकरणाचे नुतनीकरण करण्यात येते. या महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रमांना विद्यापीठाचे संलग्नीकरण आहे.

**नॅक प्रमाणित महाविद्यालय:**

महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा सुरुवातीपासूनच चांगला आहे. यु.जी.सी.ने स्थापन केलेल्या बंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून (NAAC- National Assessment & Accreditation Council) महाविद्यालयाने डिसेंबर २०१४ मध्ये तपासणी, पुनर्मुल्यांकन करून घेतलेले असून या संस्थेने महाविद्यालयास Re-Accredited (3rd Cycle) with CGPA of 3.30 on Four Point Scale at A-Grade असा दर्जा दिलेला आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ क्षेत्रातील तीनही जिल्ह्यात पुनर्मुल्यांकन करून घेणारे पहिले महाविद्यालय आहे.

**विद्यापीठ अनुदान आयोग योजना :**

महाविद्यालयास उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कायम संलग्नीकरण असून विद्यापीठ अनुदान आयोगाकडे महाविद्यालय २एफ या कलमाअंतर्गत ऑगस्ट १९७२ मध्ये संलग्नीत झाले आहे. या कलमाअंतर्गत महाविद्यालय यु.जी.सी. कडून विविध प्रकारची अनुदाने मिळविण्यास पात्र आहे. महाविद्यालयाने पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून महाविद्यालय विकास योजने अंतर्गत इमारती, संसाधने, ग्रंथालय पुस्तके, आणि प्राध्यापकांना संशोधनासाठी व परिषदांसाठी आर्थिक सहाय्य अशा प्रकारची अनुदाने मिळविली आहेत. महाविद्यालयीन नॉन रेसिडेंट स्टुडंट सेंटर, बॉईज होस्टेल, ग्रंथालय इमारत, काही वर्गखोल्या, जिम्नॅशियम ह्या इमारती या अनुदानातून उभ्या राहिलेल्या आहेत.

**सी.पी.ई.:**

शैक्षणिक वर्ष २००९ मध्ये महाविद्यालयात सी.पी.ई. (कॉलेज विथ पोटेंशियल फॉर एक्सलन्स) दर्जा यु.जी.सी. तर्फे प्रदान करण्यात आला. या अंतर्गत २००९ ते २०१४ सी.पी.ई. फेज –१, २०१४ ते २०१९ फेज–२ अंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

**शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी संख्याः**

महाविद्यालयातील प्राध्यापक आपापल्या विषयात तज्ज्ञ, अनुभवी व कार्यक्षम आहेत. वरिष्ठ महाविद्यालयात ६४ अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात ४० प्राध्यापक असून एकूण ७० शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. वरिष्ठ विभागांत पदवी अभ्यासक्रमासाठी सुमारे २०००, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सुमारे १००० व कनिष्ठ विभागात सुमारे २००० विद्यार्थी शिक्षण घेतात. तसेच उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम विभागात ०६ शिक्षक,२ शिक्षकेतर कर्मचारी असून २०० विद्यार्थी शिक्षण घेतात. द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमास १७० विद्यार्थी संख्या असते. दरवर्षी महाविद्यालयास एकूण प्रवेशीत विद्यार्थी संख्या सुमारे ५००० संख्या इतकी असते.

महाविद्यालयातील सहाय्यक/सहयोगी प्राध्यापक उच्च विद्याविभूषीत, आपल्या विषयात तज्ज्ञ आणि अनुभवी कार्यक्षम आहेत. बरेच प्राध्यापक उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ वेगवेगळी अभ्यास मंडळे व प्राधिकरणांचे सदस्य आहेत. जवळपास ६०% प्राध्यापकांनी एम.फिल व पी.एच.डी. पूर्ण केलेली आहे आणि इतर प्राध्यापक या उच्च पदव्यांसाठी संशोधन व वाचन करीत आहेत. उद्बोधन वर्गासाठी वेगवेगळ्या विद्यापीठांत प्राध्यापकांची निवड होत असते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मासिकांमध्ये शोधनपर निबंध प्रकाशित झालेले आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व इतर विद्यापीठांत प्राध्यापक आपल्या विषयांशी संबंधित कार्यशाळा, चर्चासत्रे तसेच अधिवेशने यामध्ये सहभागी होतात. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, स्पर्धा व इतर कार्यक्रमात मार्गदर्शन व प्रोत्साहन देतात.

शिक्षकेतर कर्मचारी अनुभवी असुन व उच्च दर्जाच्या सांघिक भावनेने कार्य करीत आहेत व ते संगणकाचा वापर करून आपले ज्ञान अद्ययावत ठेवतात.आपले काम तत्परतेने व निष्ठापूर्वक करीत आहेत. अशा अनमोल मानव संसाधनाचा संस्थेस अभिमान आहे.

२) **भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं.नाहाटा वाणिज्य ( कनिष्ठ व किमान कौशल्य आधारीत अभ्यासक्रम) महाविद्यालय, भुसावळ**

३) **इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर डेव्हलपमेंट, भुसावळ**

४) **ताप्ती पब्लीक स्कूल (इंग्लीश मेडीयम), भुसावळ.**

सर्व कार्यालये जामनेर रोड व नॅशनल हायवे यांचे क्रॉसींगजवळील महाविद्यालयाचे आवारात आहेत.

# २. महाविद्यालयातील विविध सुविधा

### महाविद्यालय इमारत :

संस्था आणि यु.जी.सी.च्या आर्थिक सहकार्याने परिसरात विविध अभ्यासक्रमांसाठी वर्गखोल्या आणि कार्यालये व इतर अत्यावश्यक सोयी यासाठी इमारती बांधण्यात आलेल्या असून इमारतींची विभागणी इमारत A, B, C, D,F आणि जिमखाना अशा प्रकारे करण्यात आलेली आहे. प्रेसिडेंट, प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यालयीन कामकाज यासाठी स्वतंत्र कार्यालय व्यवस्था उपलब्ध आहे. अद्यावत लेडीज रूम / विद्यार्थिनींसाठी विश्राम कक्ष, एन्.आर.सी. सेन्टर, स्टाफ रूम याकरिता स्वतंत्र व्यवस्था आहे.

### प्रयोगशाळा :

महाविद्यालयात रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतिशास्त्र, प्राणीशास्त्र, सुक्ष्मजीवशास्त्र, संख्याशास्त्र, भाषाशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल, वाणिज्य व संगणकशास्त्र यासाठी अद्यावत सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध असून प्रयोग करतांना विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. महाविद्यालयात अद्यावत व सुसज्ज लँग्वेज लॅब उपलब्ध आहे.

### ग्रंथालय :

महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सर्व विषयांवरील सुमारे ७८,४१२ महत्त्वाचे उत्कृष्ठ ग्रंथ आहेत. विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाने शिफारस केलेले ग्रंथ, क्रमिक पाठ्यपुस्तके व संदर्भ ग्रंथ यांचा समोवश ग्रंथालयात करण्यात आलेला आहे. याशिवाय अवांतर वाचनाची, सामान्य ज्ञानाची भरपूर मासिके, साप्ताहिक आणि दैनिक घेण्यात येतात. हे ग्रंथालय सकाळपासून संध्याकाळपर्यंत उघडे असते. अनामत रक्कम भरुन विद्यार्थ्यांना या ग्रंथालयातून वाचनासाठी पुस्तके घरी देण्यात येतात. याशिवाय ग्रंथालयात पुस्तकपेढीचा स्वतंत्र विभाग असून या विभागात गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके वर्षभर घरी अभ्यासासाठी देण्यात येतात. तसेच ग्रंथालयात भव्य वाचनकक्ष ही चालविला जातो. या वाचनकक्षात व्यवसाय मार्गदर्शन व विविध स्पर्धा परीक्षांची पुस्तके ही वाचण्यासाठी उपलब्ध केलेली आहेत. विभागांमध्ये सुध्दा विभागीय ग्रंथालयाची सुविधा आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

### पुस्तक पतपेढी योजना (Book Bank Scheme):

बुक बँक स्कीम या योजनेअंतर्गत गरजु, हुशार होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच देण्यात येतात. पुस्तकांची उपलब्धता लक्षात घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यास किमान तीन पुस्तके वर्षभराकरिता दिली जातात. स्पेशल विषय घेणाऱ्या पदवी तसेच पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच देण्यात येतात. पुस्तके व अंदाजपत्रकातील आर्थिक उपलब्धता यानुसार बुक बँक सेवा उपलब्ध आहे.

### जिमखाना :

महाविद्यालयातील जिमखाना विभागातर्फे देशी व विदेशी खेळांची सोय करण्यात आलेली असून आधुनिक व भव्य जिम्नॅशियम निर्माण केलेले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी खेळांत प्रथमपासून आघाडीवर आहेत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आंतर महाविद्यालयीन विभागीय सामान्यांत विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळविले आहे. आंतर विद्यापीठ सामान्यातही या महाविद्यालयातील खेळाडूंची निवड झालेली आहे.

### हेल्थ क्लब :

शैक्षणिक वर्ष २००१-२००२ पासून महाविद्यालयाच्या परिसरात अद्यायावत हेल्थ क्लबची सुविधा उपलब्ध आहे. केंद्र सरकारच्या मानव संसाधन मंत्रालयाकडून मिळालेल्या अनुदानातून हेल्थ क्लबसाठी अद्यायावत साधने उपलब्ध करण्यात आलेली आहेत. हेल्थ क्लबची सुविधा विद्यार्थी, कर्मचारी व भुसावळ परिसरातील नागरिकांसाठी नाममात्र शुल्क आकारुन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

### संगणक केंद्र :

महाविद्यालयात स्वतंत्र केंद्रीय संगणक केंद्र सेवा उपलब्ध आहे. या केंद्रामार्फत अल्पकालीन अभ्यासक्रम, प्रशिक्षण, विविध प्रकारची संगणक सेवा सुरु असून महाविद्यालयातील कार्यालय व प्रयोगशाळा संगणीकृत झालेल्या आहे. (Programming) तयार करण्याचे कार्य सुरु आहे. तसेच इंटरनेट सुविधाही उपलब्ध आहे.

### संगीत केंद्र :

महाविद्यालयात १९८६ या वर्षापासून संगीत विभाग सुरू आहे. या विभागात विद्यापीठाने तयार केलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांप्रमाणे पारंपारिक शास्त्रीय संगीत शिकविण्याची व्यवस्था आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना आधुनिक संगीताचा परिचय करुन देण्यात येतो. या विभागाचे स्वरुप संगीत केंद्रासारखे असून सर्व प्रकारची अत्याधुनिक संगीत साधने उपलब्ध आहेत. या केंद्राद्वारा महाविद्यालयात होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी आणि विद्यार्थ्यांच्या गुणसंवर्धनासाठी संगीताचे शिक्षण, प्रशिक्षण देण्यात येऊन मार्गदर्शन करण्यात येते.

### संशोधन कार्य केंद्र :

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या व विद्यापीठाच्या अपेक्षांनुसार महाविद्यालयातील मान्यताप्राप्त संशोधन केंद्रात संशोधन कार्य सुरु असते. काही प्राध्यापक मार्गदर्शक (Research Guide) म्हणून काम पहात असून काही विद्यार्थी व प्राध्यापकही त्यांचे मार्गदर्शनाखाली एम.फिल., पी.एच.डी. साठी संशोधन करीत आहेत. प्राध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मायनर रिसर्च प्रोजेक्टसाठी अनुदान मिळालेले असून त्यांचे संशोधन काम सुरु आहे.

### वैद्यकीय मदत केंद्र :

महाविद्यालय दरवर्षी नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्याची व्यवस्था आहे. त्यासाठी शहरातील अनुभवी व तज्ञ डॉक्टरांचे पॅनल करण्यात आलेले आहे. याशिवाय नेहमीच्या विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीस मदत करण्यासाठी व विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गास आवश्यकतेनुसार वैद्यकीय मदत/सहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी जुलै २००१ पासून स्वतंत्र वैद्यकीय मदत केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. या केंद्रात आवश्यक वैद्यकीय साधन सामुग्री उपलब्ध असून प्राथमिक वैद्यकीय सेवा देण्यात येते. आवश्यकतेनुसार तज्ज्ञ डॉक्टरांना निमंत्रित करण्यात येते.

### रोजगार मार्गदर्शन केंद्र (Placement Cell) :

महाविद्यालयात Placement Cell च सेंटर सुरू झालेले असून त्यातून रोजगारांच्या विविध संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत. तसेच Counseling Center द्वारा विद्यार्थ्यांच्या विविध समस्या सोडविण्यात येवून त्यांच्या शंकांचे पुर्णतया निरसन केले जाते.

### विद्यार्थिनी विकास मार्गदर्शन केंद्र :

मार्गदर्शन केंद्रातर्फे विद्यार्थिनींकरिता लेडीज डॉक्टरांना बोलावून आरोग्याविषयी सल्ला दिला जातो. तसेच लेडीज वकिलांना बोलावून वैवाहिक जीवन, घटस्फोट इ. विषयांची कायदेविषयक माहिती दिली जाते. अशाप्रकारे विकासात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात.

### उद्योजकता मार्गदर्शन केंद्र :

गेल्या दशकात खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे वारे जगभर पसरल्यामुळे संपूर्ण देशामध्ये उद्योगिक क्षेत्राची भरभराट मोठ्या प्रमाणावर होत आहे. परिणामी कारखान्यांचा विस्तार ग्रामीणभागापर्यंत होत असल्या कारणाने विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावसायिक उद्योजकीय ज्ञानाची नितांत गरज लक्षात घेऊन उद्योजक मार्गदर्शन केंद्र महाविद्यालयात सुरू केलेले आहे.

### विद्यार्थी समुपदेशन केंद्र (Student Counseling Center) :

महाविद्यालयात प्रवेश घेते वेळी विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी तसेच विविध प्रकारच्या अडीअडचणींसाठी विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले जाते. त्यासाठी स्वतंत्र समिती गठीत आहे.

### सल्ला केंद्र (Consultancy Cell) :

महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागातर्गंत गांडूळ खत निर्मिती प्रकल्प मार्गदर्शन, बगीचा व रोप वाटीका व्यवस्थापन, पदार्थविज्ञान विभागात, शेती मोटरपंपाची सुरक्षा व देखभाल, घरगुती इलेक्ट्रीक उपकरणांची दुरूस्ती व निगा, प्रयोगशाळा उभारणी, ग्रंथपाल विभागातर्फे ग्रंथालयातील सेवा, सुविधा व उभारणी, वाणिज्य विभागामार्फत कर नियोजन, गुंतवणुक नियोजन,लघुउद्योग उभारणीचा प्रकल्प अहवाल,स्वयं मुल्यांकन/स्वयं पुनर्मुल्यांकन अहवाल तयार करणे,सहकारी संस्था व बँक व्यवस्थापन,संगणक विभागात सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट,कार्यालयीन सर्व पद्धतीने मार्गदर्शन इ.कन्सल्टन्सी सेवा उपलब्ध आहेत.

### विद्यार्थ्याला सार्वजनिक क्षेत्राच्या कार्याबद्दल प्रोत्साहन :

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अध्यादेश १६३ अन्वये नमूद तरतूदीनुसार, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व शिबिर कार्यक्रम, विद्यापीठ राज्य प्रतिनिधी मधून वादविवाद/वक्तृत्त्व/नाट्य/अभिमत न्यायालय आदि उपक्रम व स्पर्धा सहभागाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्यता दिली.

क्रीडा स्पर्धा-आंतर विद्यापीठ/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून सहभाग.

उपक्रमात सहभागाबद्दल प्रोत्साहनपर कमीत कमी ५ गुण किंवा जास्तीत जास्त १० गुण देण्यात येतात.

प्रोत्साहन योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने त्याच्या सार्वजनिक क्षेत्रातील कार्याच्या शेवटच्या वर्षात येणाऱ्या नियमित विद्यार्थी परीक्षा अर्जासोबत प्रोत्साहन लाभ मागणी अर्ज आवश्यक संपूर्ण माहिती व सत्यप्रतीसह निर्देशित मुदतीपुर्वी संबंधित प्रमुख यांची शिफारस घेऊन प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांचेकडे सादर करावा.

### राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.):

जून १९६३ पासून महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे एन.सी.सी. युनिट आहे. एन.सी.सी. मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाची माफी मिळते. सन १९७५ पासून विद्यार्थिनींचे एन.सी.सी. युनिट सुरु झालेले आहे. एन.सी.सी. च्या विविध शिबिरांमध्ये आणि रिपब्लीक डे कॅम्पसाठी विद्यार्थ्यांची निवड होत असते. यु.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी. परीक्षांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या बी व सी प्रमाणपत्र परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे यश मिळत असते. एन.सी.सी. च्या परेडस् प्रत्येक रविवारी घेण्यात येतात. या वर्षापासून एन्.सी.सी. चा कालावधी हा एकूण २ वर्ष इतका झालेला आहे. पहिल्या वर्षात 'बी' प्रमाणपत्र तर दुसऱ्या वर्षात 'सी' प्रमाणपत्र या परीक्षा कॅडेटस् देवू शकतील. (प्रवेशासाठी संबंधीत विभागात माहिती मिळेल.)

### राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) :

जून १९७३ पासून महाविद्यालयात एन.एस.एस. योजना सुरु करण्यात आलेली आहे. ही योजना केंद्रीय शिक्षण व युवक कल्याण विभागाची असून राष्ट्रीय सेवा वृत्ती हे योजनेचे ध्येय आहे. यात २५० विद्यार्थ्यांना प्रवेश आहे. प्रवेशासाठी संबंधीत विभागाकडे ठरवून दिलेल्या नमुन्यात अर्ज करावा. तसेच विद्यार्थी व्यवसाय व निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत सुविधांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. या कक्षामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. या योजनेत २ वर्षे सहभाग दिल्यानंतर विद्यापीठाकडून विशेष गुणलाभ दिला जातो. समाजसेवेची आवड असलेल्या विद्यार्थी/विद्यार्थ्यानींना प्रवेशासाठी प्राधान्य दिले जाते

## विद्यार्थी विकास विभाग :

महाविद्यालयामध्ये उ.म.वि.जळगांव यांच्या विद्यार्थी विकास विभागाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात.

१) कर्मवीर भाऊराव पाटील ''कमवा व शिका योजना''

२) आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप योजना.

३) विद्यार्थीनींच्या व्यक्तीगत विकासासाठी कार्यशाळा.

४) स्वयंसिद्ध अभियान (मुलींसाठी)

महाविद्यालयामार्फत विद्यापीठस्तरीय कार्यशाळा, चर्चासत्रे शिबीरे, परिसंवाद यांच्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून पाठविले जाते.

## स्पर्धा परिक्षा केंद्र :

स्पर्धा परिक्षांच्या काळात महाविद्यालयीन विद्यार्थी कोठेही मागे राहू नये म्हणून विद्यापीठ अनूदान आयोगाच्या सहकार्याने महाविद्यालयात स्वतंत्र स्पर्धा परिक्षा केंद्र सन २०१० – ११ पासून स्थापित करण्यात आलेले आहे. सदर केंद्रात स्वतंत्र वाचन कक्ष व स्वतंत्र वाचनालय उपलब्ध आहे. एकावेळेस पन्नास विद्यार्थी बसण्याची व्यवस्था असलेले प्रसन्न वाचन कक्षाचा लाभ विद्यार्थी सतत घेत असतात. तसेच वेळोवेळी तज्ञाचे मार्गदर्शन सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येते.

## महिला तक्रार निवारण समिती :

समितीमार्फत महाविद्यालयीन विद्यार्थीनींच्या समस्या जाणुन घेतल्या जातात. एखाद्या विद्यार्थीनीला मानसिक, सामाजिक त्रास होत असेल, छळ होत असेल तर त्या विद्यार्थीनीचे समुपदेशन करुन योग्य ती कार्यवाही समितीमार्फत केली जाते. विद्यार्थीनींचे आत्मबळ वाढावे म्हणुन वेगवेगळ्या प्रश्नांवर आधारीत कार्यक्रम राबविले जातात, वैद्यकीय सल्ला दिला जातो . ज्युडो, कराटे क्लासेस घेतले जातात. परिणामी मुलांमध्ये भीती कमी होऊन अभ्यासात लक्ष लागुन विद्यार्थीनींचे व्यक्तीमत्व खुलते.

## शारीरिक शिक्षण विभाग :

सर्व विद्यार्थ्यांची नावे शारीरिक शिक्षण विभागात नोंदविली जातात.विविध प्रकारच्या खेळांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येते. सविस्तर माहिती शारीरिक शिक्षण प्रमुखांकडे मिळेल.

## कौशल्य विकास केंद्र :

विविध प्रकारचे कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे या उद्देशाने कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे.

## अभ्यासेतर कार्यक्रम :

अभ्यास क्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या अंगाच्या विविध कलागुणांचे विकास होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने सांस्कृतिक विकासाचे व कला विकासाचे कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी केली जाते. शैक्षणिक सहली काढण्यात येतात आणि विद्वान वक्त्यांची व्याख्याने, परिसंवाद, विद्यार्थ्यांचा चर्चात्मक कार्यक्रम राबविण्यात येतात. तसेच संगीत, नाटक इत्यादी ललित कामांचे कार्यक्रम योजले जातात. कला मंडळ, वाङ्मय मंडळ, साहित्य साधना, हिंदी साहित्य सभा, इतिहास मंडळ, सामाजिक शास्त्र मंडळ, नियोजन मंडळ, वाणिज्य मंडळ, भूगोल मंडळ, इंग्रजी साहित्य मंडळ, विद्यार्थिनी विकास मंडळ, विज्ञान मंडळ, विवेक वाहिनी केंद्र इ. बहुविध मंडळाद्वारा विद्यार्थ्यांना आपल्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकास करुन घेता येतो.

## महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक :

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयाचे तरंग नियतकालीक प्रसिद्ध करण्यात येते. या नियतकालिकात प्रामुख्याने विद्यार्थ्यांचे साहित्य प्रसिद्ध करण्यात येते. तसेच विविध समित्यांचे अहवाल, विभागांचे अहवाल प्रसिद्ध करण्यात येतात. नियतकालिकाचा दर्जा सातत्याने उत्तम राखण्यात आलेला असून दरवर्षी महाविद्यालयातील नियतकालिकांच्या स्पर्धेत हा अंक उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभागाकडे दाखल करण्यात येतो.

## विद्यार्थी सहकारी भांडार :

१९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सहकारी भांडार सुरु करण्यात आलेले आहे. सर्व विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी करुन घेण्यासाठी प्रत्येक नवीन विद्यार्थ्यांस शुल्क रु. १ आणि शेअर रु.१० असे एकूण रु. ११ द्यावे लागतात. आवश्यकतेनुसार सहकार भांडाराच्या दैनंदिन कारभारात विद्यार्थ्यांचा समावेश केला जातो. तसेच सहकार भांडाराच्या कार्यकारिणीत विद्यार्थी प्रतिनिधीचा आवश्यक त्या प्रमाणात सहभाग असतो. भांडारातून वह्या, प्रात्यक्षिक वह्या, रजिस्टर्स, माहिती पुस्तिका, परीक्षा फॉर्मस, लिव्हिंग फॉर्मस् व स्टेशनरी इ. साहित्य योग्य किंमतीत उपलब्ध करुन दिले जाते.

## सायकल स्टँड : महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी सायकल/मोटरसायकल

विद्यार्थ्यांने आपली सायकल/मोटार सायकल महाविद्यालयाच्या स्टँडवरच ठेवणे आवश्यक आहे. सायकलला चांगले कुलूप लावूनच स्टँडवरच ठेवावी. वाहन/सायकल महाविद्यालयाचे परिसराचे बाहेर रस्त्यावर ठेवू नये. वाहन/सायकल स्वत:चे जबाबदारीवर ठेवावे. महाविद्यालयीन परिसरात हॉर्न (Horn) वाजवण्यास सक्त मनाई आहे.

## कँटीन :

संस्थेने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निसर्ग समृद्ध परिसरात सुसज्ज कँटीनची सेवा उपलब्ध करून दिलेली आहे. या परिसरात विद्यार्थी /विद्यार्थीनी, शिक्षक व कर्मचारी यांचेसाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध आहे. माफक दरात विविध खाद्यपदार्थ उपलब्ध करून दिले जातात.

## पालक शिक्षक संघ (Parents Teacher Association) :

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीच्या अभ्यासक्रमाबाबतच्या अभ्यासक्रमेतर उपक्रमाबाबतच्या पालकांकडून विधायक सुचना मिळणेसाठी त्याचप्रमाणे शिक्षण प्रक्रियेचा केंद्र बिंदू विद्यार्थी, त्यांचे पालक व शिक्षक यांच्यात समन्वय साधण्यासाठी आणि त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी शिक्षक पालक संघामार्फत विविध विधायक शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या सर्वच विद्यार्थ्यांचे पालक या संघाचे सभासद असतात. त्यासाठी वार्षिक सदस्यत्व शुल्क रु. २०/- इतके राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ग्रंथालयात संपर्क करावयाचा आहे. सदस्यत्व शुल्क ओळखपत्र काढतांना ग्रंथालयात जमा करावयाचे आहे.

### माजी विद्यार्थी संघ (Alumni) :

माजी विद्यार्थ्यांसाठी TES's Collegian Association ची स्थापना झालेली असून ही असोसिएशन कार्यरत आहे. माजी विद्यार्थ्यांनी सभासद होवून आपल्या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात सहभागी व्हावे व महाविद्यालयात आपल्या अनुभव व ज्ञानाचा फायदा देवून आपले योगदान करावे ही अपेक्षा आहे.

### विद्यार्थी सामुहिक सुरक्षा अपघात विमा योजना :

विद्यार्थी सामुहिक सुरक्षा अपघात विमा योजनेत रू.१०/- शुल्क भरून प्रवेशित विद्यार्थ्याने सहभागी होणे आवश्यक आहे. शैक्षणिक कालावधीमध्ये विद्यार्थ्याला अपघात होऊन मृत्यु झाल्यास रू. १०,०००/-, कायमचे अपंगत्व आल्यास (दोन डोळे, हात, पाय / दोन अवयव / एक डोळा, हात व पाय यांचे पूर्ण नुकसान) झाल्यास रू. १०,०००/-, अपघातात एक डोळा/हात/पाय/अवयव निकामी झाल्यास रू. ५,०००/- तसेच अपघातामुळे उद्भवलेल्या वैद्यकीय खर्चास रू. ५००/- आर्थिक लाभ आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर मिळतो.

### शिष्यवृत्ती आणि आर्थिक सवलत योजना

* केंद्र शासन व महाराष्ट्र राज्य शासनाच्या वेळोवेळी होणाऱ्या नियमांच्या बदलास बांधील असतील.
* शिष्यवृत्ती अर्ज करताना राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. शिष्यवृत्ती बँक खात्यातच जमा होईल.

#### १) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी सवलत (EBC Scheme)

EBC सवलतीसाठी ऑनलाईन पध्दती सुरु करण्यात आलेले आहे. कृपया विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने EBC अर्ज भरावेत.

अ) रु.१,००,०००/- च्या खाली वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी अनुदानित अभ्यासक्रमासाठी राज्य सरकारने ही योजना सुरु केली आहे. महाविद्यालयात प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांना या सवलतीसाठी कार्यालयात प्रवेश अर्जासोबत ठराविक फॉर्ममध्ये अर्ज करावा लागतो. अर्जासोबत पालकांच्या आर्थिक उत्पन्नाचा दाखला जोडावा लागतो. दहा हजार किंवा त्यापेक्षा कमी वस्ती असणाऱ्या भागास सरकारी नियमाप्रमाणे ग्रामीण भाग असे समजण्यात येते व दहा हजार लोकसंख्येवरील गावांना नागरी भाग असे समजण्यात येते. वरील अर्जासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु.१,००,०००/- च्या खाली उत्पन्न असल्याचा सरपंचाचा दाखला आणावा लागतो. दहा हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरातून विद्यार्थ्यांना आपल्या पालकांचे उत्पन्न रु.१,००,०००/- च्या खाली असल्याचा दाखला सरकारी गॅझेटेड ऑफिसर्स/विशेष कार्यकारी अधिकारी/मामलेदार यांचेकडून आणावा लागतो.

ब) ज्या विद्यार्थ्यास मागील वर्षी इ.बी.सी. सवलत मिळत होती त्यांनी नूतनीकरण अर्ज दोन प्रतीत संपूर्ण भरुन उत्पन्नाचे दाखल्यासह द्यावेत. व ज्या विद्यार्थ्यास चालू वर्षी प्रथमच इ.बी.सी. सवलत घ्यावयाची असेल त्यांनी नवीन अर्ज आणि उत्पन्नाचा दाखला व ती सवलत घेण्याचे कारण यांचे प्रतिज्ञा पत्र दोन प्रतीत द्यावे

क) या योजनेखाली टंचाईग्रस्त भागात वास्तव्य असणाऱ्या इ.बी.सी. धारक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षात दि. १५ जानेवारी पावेतो अर्ज केल्यास परीक्षा फी शासनाकडून परत मिळते. टंचाईग्रस्त असल्याबाबत संबंधित अधिकाऱ्याचा दाखला अर्जासोबत जोडावा लागतो.

## ०२) प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या मुलांसाठी फी सवलत : FREE EDUCATION TO THE CHILDREN OF PRIMARY SCHOOL TEACHERS (F.E.P.T.) SECONDARY SCHOOL TEACHERS (STC)

शे.४५ पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना शासकीय अनुदानित अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा फायदा मिळेल.

## ०३) प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती : SCHOLARSHIPS TO CHILDREN OF PRIMARY TEACHERS:

प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांसाठी केंद्रसरकारने ही शिष्यवृत्ती सुरु केली आहे. एस.एस.सी. परीक्षेत शेकडा ६० चे वर गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना यासाठी अर्ज करता येतो. व त्यांना ही शिष्यवृत्ती दरमहा रु. ४०/- असते. व पुढील वर्षाच्या परीक्षेत किमान द्वितीय श्रेणी मिळाल्यास चालू राहते. मात्र यासाठी आई वडिलांचे वार्षिक उत्पन्न रु.२५०००/- चे आत पाहिजे.

## ०४) भारत सरकार शिष्यवृत्ती / फी सवलत योजना: OBC/VJNT Scholarship/Freeship Scheme

केंद्र सरकारतर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ह्या योजने अंतर्गत खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती मिळते.

दरमहा शिष्यवृत्ती (एकूण १० महिन्यांकरीता)

| क्र. | गट | अनिवासी | वसतिगृहात राहणारे |
|---|---|---|---|
| १. | गट - सी (पदव्युत्तर कोर्सेस) | रू. १९० | रू. २९० |
| २. | गट - डी (एस्.वाय./टी.वाय. पदवी कोर्सेस) | रू. १२० | रू. २३० |
| ३. | गट - ई (एफ्.वाय. पदवी कोर्सेस) | रू. ९० | रू. १५० |

टीप - प्रथम वर्ष/द्वितीय वर्ष कला/विज्ञान/वाणिज्य तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांस प्रवेश घेवू इच्छिणारे विद्यार्थ्यांसाठी पालकांची उत्पन्न मधील मर्यादा रू. १,००,००० अशी आहे.

ह्या शिष्यवृत्तीसाठी तृतीय वर्ष कला / विज्ञान आणि वाणिज्य अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे असून उत्पन्नानुसार शिष्यवृत्ती मंजूर करणेत येते.

(अ) रू. ४९,०००/- अथवा त्यापेक्षा कमी, इतके वार्षिक उत्पन्न असणाऱ्याकरिता पूर्ण दराने शिष्यवृत्ती मंजूर होते.

(ब) रू. ४९,००१/- ते रू. ६५,२९०/- या दरम्यान वार्षिक उत्पन्न असणाऱ्याकरिता १/२ दराने शिष्यवृत्ती मंजूर होते.

(क) रू. ६५,२९०/- पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही.

## ०५) भारत सरकार शिष्यवृत्ती / फी सवलत योजना (अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती विद्यार्थ्यांकरीता): SC/ST Scholarship / Freeship Scheme-

या योजनेकरीता पालकांची उत्पन्न मर्यादा रु. २,००,०००/– (रू.दोन लाख मात्र) आहे.

केंद्र सरकारतर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ह्या योजने अंतर्गत खालील प्रमाणे शिष्यवृत्ती मिळते.

दरमहा शिष्यवृत्ती (एकूण १० महिन्यांकरीता)

| क्र. | गट | अनिवासी | वसतीगृहात राहणारे |
|---|---|---|---|
| १. | गट - सी (पदव्युत्तर कोर्सेस) | रु. ३३० | रु. ५१० |
| २. | गट - डी (एस्.वाय/टी.वाय. पदवी कोर्सेस) | रु. १८५ | रु. ३५५ |
| ३. | गट - ई (एफ.वाय. पदवी कोर्सेस) | रु. १४० | रु. २३५ |

ज्या विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न उपरोक्त मर्यादेच्या वर आहे. त्यांनी फ्रीशिपचे अर्ज कार्यालयात मुदतीत दाखल करावेत. शिष्यवृत्तीचे कोरे अर्ज ग्राहक भांडारात मिळतात. अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रक इ. आवश्यक कागदपत्रके जोडणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती नुतनीकरणाचा अर्ज दाखल केल्यानंतर संबधीत विद्यार्थ्यांस शैक्षणिक साहित्य, पुस्तके व परीक्षा शुल्क यांसाठी अग्रीम रकमा दिल्या जातात.

सर्व संवर्गाच्या शिष्यवृत्ती व फ्रिशिप सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांची महाविद्यालयात ७५% हजेरी असणे अत्यावश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिप देय राहील. ७५% पेक्षा कमी हजेरी असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिप मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

**महत्त्वाची टिप** :– समाज कल्याण कार्यालय, जळगाव यांच्याकडून मिळणारी भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रिशीप सवलतीचे अर्ज सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी ऑन लाईन पध्दतीने भरावेत. जे विद्यार्थी ऑन लाईन पध्दतीने फी सवलतीचे अर्ज भरणार नाहीत, त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची संपूर्ण फी भरावी लागेल. फी सवलतीचे अर्ज भरण्यासाठी समाज कल्याण वेबसाईट पाहावी. 1) mahaeschol.maharashtra.gov.in 2) www.mahaeschol.gov.in

## ०६) खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (GOVT. OPEN MERIT SCHOLARSHIP)

ही स्कॉलरशिप एस.एस.सी./एच.सी.सी. परीक्षेत शेकडा ६० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणांच्या क्रमानुसार दिली जाते व पुढे विद्यापीठाच्या परिक्षेत उच्च द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळावयाचा संभव असतो. वरील गुण मिळविणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती मिळतेच असे नाही. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांमधून जास्तीत जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड केली जाते. या शिष्यवृत्त्या राज्य सरकारच्या असून मे. डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांच्यामार्फत दिल्या जातात. यासाठी जरुर ते फॉर्मस् महाविद्यालयाच्या कार्यालयात मिळतात.

## ०७) एकलव्य शिष्यवृत्ती –

एकलव्य शैक्षणिक योजनेनुसार पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गरीब, बुद्धीमान विद्यार्थ्यास शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य महाराष्ट्र शासनातर्फे गरीब व बुद्धीमान विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुलभ व्हावे यादृष्टीने राज्यस्तरीय एकलव्य शैक्षणिक योजने अंतर्गत रु. ५०००/- प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येते. त्याकरिता पुढील बाबी/अटी पूर्ण करणारे विद्यार्थी पात्र राहतील.

अ) पदवी परीक्षेमध्ये विज्ञान शाखेत ७० टक्के व इतर सर्व शाखेत ६० टक्के गुण मिळविणारे विद्यार्थी

ब) पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आई-वडिलांचे उत्पन्न रु. ३५०००/- प्रतिवर्ष पेक्षा कमी पाहिजे.

क) हे आर्थिक सहाय्य घेणाऱ्या विद्यार्थ्यास फी माफीची सवलत पात्र राहील. नियमित उपस्थिती शे. ७५ टक्के व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षासाठी शिष्यवृत्ती लागू/चालू राहील.

ड) या योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य मंजूर झाल्यास त्याला केंद्र/राज्य शासनाची कोणतीही शिष्यवृत्ती स्वीकारता येणार नाही.

ई) आर्थिक सहाय्य ज्या अभ्यासक्रमासाठी मंजूर करण्यात येईल तो अभ्यासक्रम बदलल्यास अथवा मध्येच सोडून दिल्यास सदर आर्थिक सहाय्य रद्द करण्यात येईल.

पात्र विद्यार्थ्यांनी कार्यालयातून अर्जाचा नमुना घेवून तो भरुन आवश्यक त्या अधिकाऱ्यांचे दाखले व सह्या घेवून प्रवेश घेतल्यानंतर ३० दिवसांचे आत सादर करावे.

## ०८) राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनाः NATIONAL SCHOLARSHIPS - (प्रथमवर्ष पदवीच्या विद्यार्थ्यांकरीता)

ह्या शिष्यवृत्तीसाठी एच.एस.सी. बोर्ड पुणे यांचेकडून विद्यार्थ्यांची गुणानुक्रमाने निवड होते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयाकडेस म. शिक्षण संचालक, पुणे यांचेकडून मंजूर झाल्यानंतर शिष्यवृत्ती मिळते. ह्या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट रु. २५०००/- आहे.

### ०९) अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलत : (Scholarships To Physically Handicapped Students)

शारीरिक दृष्ट्या अधू व अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशिप मिळते. ही स्कॉलरशिप दरमहा रु. ६०/- याप्रमाणे मिळते. अर्जासोबत विद्यार्थ्यांना अपंग असल्याचे सिव्हील सर्जनचे सर्टीफिकेट जोडावे लागते. अर्ज करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशिप मिळतेच असे नाही.

### १०) अल्पसंख्यांक मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (Minority Scholarship )

महाराष्ट्र शासन क्र. उशिर/अल्पसंविमॅशिमो/२००७-०८/३/१४ मई/९८२ दि. २८/०१/२००८ नुसार. (मुस्लिम, पारशी, शिख, ख्रिश्चन व बौध्द) या समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे व गुणांची आवश्यकता आहे. शिष्यवृत्तीचा लाभ घेतांना किमान ५०% गुणांची अट बंधनकारक आहे व दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल व नंतर उत्पन्न मर्यादेच्या चढत्या क्रमाने पात्र विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

सदर शिष्यवृत्तीधारकांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न सर्व मार्गांनी मिळून रूपये २ लाखापर्यंतची अट बंधनकारक राहील.

सदर शिष्यवृत्ती प्रत्येक कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना अनुज्ञेय असलेली अट बंधनकारक राहील.

अर्जासोबत अल्पसंख्यांक असल्याचा सक्षम अधिकाऱ्याचा सहीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रकाची छायाप्रत इ.

## ३. अभ्यासक्रम प्रवेश

### ३.१ सर्वसाधारण नियम / माहिती :

१) प्रवेश अर्ज संपूर्णपणे व बिनचूक भरला पाहिजे. प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे उदा. लिव्हिंग सर्टिफिकेट, स्थलांतर दाखला, गुणपत्रक, पात्रता अर्ज, शिष्यवृत्त्या, आधार कार्ड, पॅन कार्ड, रहिवास दाखला, रेशन कार्ड व आर्थिक सवलतींसाठी लागणारे अर्ज/दाखले, एन.सी.सी./एन.एस.एस. सदस्यत्वाचे अर्ज ग्रंथालय सभासदत्वाचा अर्ज, सायकल स्टँड वर ठेवण्यासाठीचा अर्ज, इत्यादींबाबत माहिती पुस्तिकेत दिलेली माहिती वाचून ती योग्य त्यावेळी मुदतीत सादर करणे अत्यंत आवश्यक आहे. संबंधित कागदपत्रे प्रवेशासाठी त्वरित जमवून ठेवावी. महत्त्वाच्या कागदपत्रांच्या जादा झेरॉक्स सत्यप्रती आपल्याजवळही ठेवून राखाव्यात. महाविद्यालयात एकदा जमा केलेली कागदपत्रे अशा झेरॉक्स प्रती करण्यासाठी कार्यालयातून मिळणार नाही याची नोंद घ्यावी. कागदपत्र सादर करण्याबाबत वेळोवेळी लावल्या जाणाऱ्या सूचना फलकावर पहाव्या.

२) विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज स्वत: भरावा व फी भरल्याशिवाय प्रवेश निश्चित होत नाही याची नोंद घ्यावी.

३) फी सवलती/स्कॉलरशिप/इत्यादींसाठी मुदतीत अर्ज न केल्यास व ती न मिळाल्यास त्याबाबतची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. सवलत नामंजूर झाल्यास फी भरावी लागेल.

४) प्रवेश अर्जात घ्यावयाचे विषय लिहिण्यापूर्वी माहितीपुस्तिकेत पुढे याबाबत दिलेली सविस्तर माहिती वाचावी. अधिक माहिती करीता प्रवेश समिती सदस्यांशी संपर्क साधावा.

५) महाविद्यालयात प्रवेश देणे हे गुणवत्ता, वर्तणूक इत्यादी घटकांवर अवलंबून राहील. प्रवेश अर्ज स्वीकारल्यानंतर प्रवेश देण्याचा अंतिम अधिकार प्राचार्यांचा राहील.

६) विद्यापीठ अध्यादेश क्र.११६ प्रमाणे कोणत्याही विद्यार्थ्यास एकाच वर्षात एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येत नाही. त्यास एका शैक्षणिक वर्षात एक पदवी व एक पदविका अभ्यासक्रमास नाव नोंदविता येते. मात्र तो बसणार असलेल्या दोन्ही अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ परीक्षा एकाच वेळी येत असल्यास त्या अथवा इतर कोणत्याही कारणास्तव परीक्षांच्या कार्यक्रमात बदल केला जात नाही अथवा सवलत

दिली जात नाही. याबाबतची नोंद घेऊन विद्यार्थ्यांनी विचारपूर्वक अभ्यासक्रम ठरवावेत. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेश संख्येप्रमाणे प्रत्येक वर्गात प्रवेश देण्यात येईल.पुरेशी विद्यार्थी संख्या नसल्यास अशा विषयांना दिलेला प्रवेश रद्द करण्याचा अधिकार प्राचार्यांनी राखुन ठेवलेला आहे.

७) प्रवेशाचे नियमात व मुदतीत वेळोवेळी केलेले बदल सूचना फलकावर पहावे.

## ८) विद्यापीठ पात्रता प्रमाण पत्र (ELIGIBILITY CERTIFICATE)

प्रथम वर्ष बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम./बी.बी.ए. व बी.एम.एस. (ई-कॉमर्स) या वर्गात प्रवेश निश्चित होण्यासाठी विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असते. त्यासाठी विद्यार्थ्याचा पात्रता अर्ज (Eligibility Form) व परीक्षेचे गुणपत्रक महाविद्यालय विद्यापीठाकडे पाठविते. त्यानंतर विद्यापीठाकडून प्रवेशाबद्दल मान्यता देण्यात येते. विद्यापीठाकडून अशी मान्यता न मिळाल्यास प्रवेश रद्द केला जाईल व त्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील. यासाठी विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक अर्ज व लागणारे कागदपत्र मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या एच.एस.सी. परीक्षेव्यतिरिक्त इतर उच्च माध्यमिक किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठाकडून मान्य होण्यासाठी महाविद्यालयाच्या कार्यालयातून योग्य ती माहिती घेऊन अर्ज करावा. असे पात्रता पत्रक मिळणेकरीता रु. ५०/- अथवा रु.१२०/- इतके शुल्क अर्जासोबत भरावे लागते. इतर विद्यापीठातून आलेल्यांनी पात्रता प्रमाणपत्रासंबंधी माहिती कार्यालयातून घ्यावी.

## ९) शाळा सोडल्याचा दाखला (School Leaving Certificate)

एच.एस.सी.(१२वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला प्रवेश अर्जासोबत सादर करावा लागतो.

## १०) महाविद्यालय सोडल्याचा दाखला (Transference Certificate)

विद्यार्थ्याने महाविद्यालयातील शिक्षण सोडल्यावर त्याने मागणी केल्यानुसार त्यास महाविद्यालय सोडल्याचा दाखला (टी.सी.) दिला जातो. एकाच विद्यापीठ क्षेत्रातील एका महाविद्यालयातून नाव कमी करुन दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास हा दाखला द्यावा लागतो. ह्या महाविद्यालयातून टी.सी. हवे असल्यास विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारातून त्यासाठीचा अर्ज घेऊन व भरुन कार्यालयात सादर केल्यानंतर साधारणपणे ३ दिवसात टी.सी. मिळेल. त्यासाठी महाविद्यालय सोडल्यापासून पहिल्या टर्म ला २०/- तीन वर्षाकरिता रु. ५०/- व त्यानंतर जास्तीत जास्त रु. १००/- याप्रमाणे फी भरावी लागते. एकदा भरलेली फी परत मिळणार नाही. काही कारणाने दुसरे टी.सी. हवे असेल तर ड्युप्लीकेट असा उल्लेख असलेले टी.सी. मिळेल. ज्या विद्यार्थ्याने ह्या महाविद्यालयातून टी.सी. काढलेले आहे त्यास तेथून विद्यापीठ परीक्षा अर्ज भरता येणार नाही.

## ११) स्थलांतराचा दाखला : (Migration Certificate)

एका विद्यापीठातील महाविद्यालयातून दुसऱ्या विद्यापीठातील महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यास हा स्थलांतराचा दाखला सादर करावा लागतो. एक विद्यापीठ सोडून दुसऱ्या विद्यापीठात जाताना याची गरज असते. हा दाखला मिळण्यासाठी विद्यार्थी आधी ज्या विद्यापीठात होता तेथे महाविद्यालयामार्फत त्यासाठीचा अर्ज करावा लागतो. अर्जासोबत मूळ टी.सी. जोडावे लागते. आपल्या महाविद्यालयातून दुसऱ्या विद्यापीठांतर्गत महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास स्थलांतरासाठी करावयाचा छापील अर्ज विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारात मिळेल. सदर अर्ज कार्यालयातुन तपासल्यानंतर प्राचार्यांची सही घ्यावी व विद्यार्थ्याने स्वतः विद्यापीठाकडे पाठवावा.

## ३.२ पात्रता व प्रक्रिया

### प्रथम वर्ष बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम./बी.बी.ए./ बी.एम.एस. (ई-कॉमर्स)/बी.सी.ए.

**पात्रता :**

उ. म. विद्यापीठ परिपत्रक क्रमांक ७४/१९९५ नुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची +२ स्तरावरील एच.एस.सी. (१२वी) अगर तत्सम परीक्षा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास एफ.वाय./बी.ए./बी.कॉम. वर्गात प्रवेश देण्यात येईल.

डी.एड. पदविका अभ्यासक्रम इंग्रजी विषयासह उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यास एफ.वाय.बी.ए. या वर्गात प्रवेश घेता येईल.

अभियांत्रिकी पदविकाधारकास एफ.वाय.बी.कॉम. ला प्रवेश घेता येईल.

एफ.वाय.बी.एस्सी. या वर्गाला प्रवेशासाठी एच.एस.सी. या वर्गाला प्रवेशासाठी विद्यार्थी पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित यापैकी कोणतेही तीन व इंग्रजी विषय घेऊन +२ स्तरावरील एच.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झालेला असला पाहिजे.

अभियांत्रिकी पदविकाधारकास एफ.वाय.बी.एस्सी. ला प्रवेश घेता येईल.

केंद्रीय परीक्षा मंडळ नवी दिल्ली येथून ऑल इंडिया सिनीअर स्कूल सर्टिफिकेट (१०+२) परीक्षा कंपार्टमेंटमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उ.म.वि. नियमानुसार १९९४-९५ पासून प्रथम वर्ष वर्गास प्रवेश देता येत नाही. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर करु नये.

प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य या वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी १०वी, ११वी, १२वी ला इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेले असले पाहिजे.

**प्रक्रिया :**

१२ वी परीक्षेचा/पदवी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर साधारण २० दिवसांच्या आत (प्रवेश जाहिरात व सूचना फलकावर सूचना पहावी) विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ह्या माहिती पुस्तिके सोबत जोडलेला प्रवेश नमुन्यातील अर्ज पूर्णपणे भरुन (भरण्याआधी माहिती पुस्तिका वाचणे) महाविद्यालयात दाखल करणे आवश्यक आहे. यावेळी फी जमा करायची नाही. अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे -

अ) मूळ लिव्हिंग सर्टिफिकेट व त्याच्या दोन सत्यप्रती.

ब) १२वी/डी.एड./अभियांत्रिकी पदविका/पदवीचे मूळ गुणपत्रक व त्याच्या दोन सत्यप्रती.

क) पदव्युत्तर वर्गास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पात्रता दाखला जोडावयाचा आहे.

ड) पूर्णपणे भरलेला विद्यापीठ पात्रता अर्ज.

इ) राखीव जागांवर प्रवेशासाठी जातीच्या दाखल्याची सत्यप्रत.

प्रवेशाचे नियमान्वये गुणवत्तेनुसार व राखीव जागांवर द्यावयाचे प्रवेशानुसार सूचनाफलकावर यादी लावल्यावर विद्यार्थ्यांनी पाच दिवसांचे आत कार्यालयात रोख फी भरुन प्रवेश निश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सदरच्या यादीनुसार मुदतीत प्रवेश न घेतल्यास जागेवर विद्यार्थ्यांचा हक्क राहणार नाही व यादीतील पुढील विद्यार्थ्यांस अशा जागी प्रवेश देण्यात येईल.

**३० जुलै नंतर जागा शिल्लक असल्यास व विद्यापीठाने पूर्वपरवानगी दिल्यासच महाविद्यालय प्रवेश देऊ शकेल.**

डी. एड./अभियांत्रिकी पदविकाधारकास एकूण प्रवेश क्षमतेच्या १० टक्के पर्यंत प्रवेश देता येईल.

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के जागांवर खालीलप्रमाणे मागासवर्गीय घटकांना प्रवेश दिला जाईल.

| संवर्ग | टक्केवारी |
|---|---|
| अ) अनुसूचित जाती व बौद्ध धर्मांतरीत जाती | १३ |
| ब) अनुसूचित जमाती | ०७ |
| क) विमुक्त जाती व भटक्या जमाती | ०३ |
| विमुक्त जाती व तत्सम चौदा जाती- | |
| एन.टी. १ भटक्या जमाती व (जाने.९० पूर्वीच्या) २ टक्के तत्सम जमाती | ०२.५ |
| ✻ एन.टी. २ भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ०३.५ |
| ✻ एन.टी. ३ भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | ०२.० |
| ड) ✻ इतर मागासवर्गीय जाती | १९ |
| एकूण | ५0% |

✻ अपंग विद्यार्थ्यांना प्रवेश क्षमतेच्या ३% प्रवेश देण्यात येतील.

✻ चिन्ह असलेल्या आरक्षित जागांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास/विद्यार्थ्यास क्रिमीलेअर सर्टीफिकेट आणि जातीचा दाखला प्रवेश अर्जासोबत जोडल्यावरच उपरोक्त राखीव जागांवर आरक्षण ठेवता येईल.

उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टी.ई.एम./३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१

दि. ११ जुलै, १९९७ नुसार विशेष मागास वर्गाचेच (S.B.C.) जातीचे प्रमाणपत्र सादर केल्यास विद्यार्थ्यास कोणत्याही आरक्षणाचा फायदा मिळणार नाही. मात्र गुणवत्ता यादीनुसार ही प्रवेशप्रक्रिया केलेनंतर जर कोणत्याही मागास वर्गीयासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागांवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के प्रवेशासाठी विशेष मागासवर्गीय उमेदवारास गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

इतर राखीव जागांच्या कोट्यामधील प्रवेश वरीलप्रमाणे पूर्ण होवू न शकल्यास प्रथमत: उर्वरीत राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतील. या उपरही जागा रिक्त राहिल्यास त्या जागांवर खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

### द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम./बी.बी.ए./ बी.एम.एस. (ई-कॉमर्स)/बी.सी.ए.

१) एस.वाय./टी.वाय.बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम./बी.बी.ए./ बी.एम.एस. (ई-कॉमर्स) या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्या आधीच्या वर्गाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर १० दिवसांचे आत आपले प्रवेश अर्ज महाविद्यालयात दाखल करुन फी सह प्रवेश घेणे आवश्यक आहे. एस.वाय. प्रवेशासाठी एफ.वाय. च्या तर टी.वाय. प्रवेशासाठी एफ.वाय. व एस.वाय च्या गुणपत्रकांची झेरॉक्स सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.

२) उ.म.वि. परिपत्रक क्रमांक ३२/१९९५ नुसार इतर विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विषय बदलून उ.म.वि. अंतर्गत दुसऱ्यांदा पदवी अभ्यासक्रमास प्रवेश देता येणार नाही.

### एम.ए./एम.एस्सी./एम.कॉम. – भाग १

अ) एम.ए., एम.कॉम. भाग १ साठी उमवि पत्र क्र. उमवि/१२/एम.ए.,एम.एस्सी.४००/९७ता.१४/४/१९९७ अन्वये महाविद्यालयाने गुणवत्तेच्या निकषावर प्रवेश द्यावयाचे आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज फी सह महाविद्यालयात दाखल करावयाचे आहेत.

ब) शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून एम.एस्सी. सर्व विषय व एम्.ए (भूगोल) या अभ्यासक्रमाचे प्रवेश विद्यापीठाद्वारे केंद्रीय पध्दतीने केले जातील. विद्यापीठात अर्ज दाखल करावयाचे आहेत. गुणवत्तेनुसार प्रवेश याद्या जाहीर केल्यानंतरच विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयात एम.एस्सी. भाग १ साठी फी सह प्रवेश घ्यावयाचा आहे.

### एम.ए./एम.एस्सी./एम.कॉम. – भाग २

पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी १० दिवसांचे आंत भाग २ ह्या वर्गात प्रवेशासाठी महाविद्यालयाच्या नमुन्यातील प्रवेश अर्ज दाखल करुन फी सह त्वरित प्रवेश घ्यावेत.

### प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सर्टीफिकेट कोर्सेस)

महाविद्यालयात शिकत असलेले पदवी/ पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमात प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमाचा कालावधी १ वर्षाचा असतो. या अभ्यासक्रमासाठी पात्रता इ.१२वी (एच.एस.सी.) उत्तीर्ण आहे.

## ४. अभ्यासक्रम व विषय

महाविद्यालयात शिकविण्यात येणाऱ्या पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षे व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा कालावधी २ वर्षे आहे.

वेगवेगळ्या वर्गासाठी ह्या महाविद्यालयात शिकविण्यात येत असलेल्या विषयांची यादी दिली आहे. ज्या वर्गात विद्यार्थ्यांला प्रवेश घ्यावयाचा असेल त्या वर्गात शिकविण्यात येणाऱ्या विषयांच्या यादीमधून विद्यार्थ्यांने विषयाची निवड करावी आणि विषयांची नावे प्रवेश अर्जामध्ये लिहावीत. पुढे शिक्षण घेतांना कोणते विषय व अभ्यासक्रम करावयाचे आहेत व त्यासाठी काय अटी असतील ह्याबाबतची माहिती घेऊनच त्यानुसार प्रवेश घ्यावेत. माहिती पुस्तिकेत फक्त सर्वसाधारण माहितीच दिलेली आहे.

**सर्व प्रथमवर्ष** (बीए/बीएस्सी/बीकॉम/बीबीए/बीसीए/ बी.एम.एस.(ई–कॉमर्स) पदवीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण अभ्यासक्रम (Environment Studies) हा विषय **अनिवार्य** आहे.

**सर्व द्वितीय वर्ष** (कला/विज्ञान/वाणिज्य) या वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी **सामान्यज्ञान** हा विषय **अनिवार्य** आहे. या विषयाची परिक्षा विद्यापीठातर्फे परीक्षेबरोबर घेतली जाते. या विषयाच्या मार्गदर्शन व्यवस्थेबद्दल सूचना फलकावर वेळोवेळी सूचना लावल्या पाहिजेत.

अर्जामध्ये विषय लिहीण्यापूर्वी पूर्ण विचार करावा. विषय लिहिल्यावर खाडाखोड करु नये. अर्जात लिहिलेले व महाविद्यालयाने ज्या विषयांसाठी प्रवेश दिला असेल त्याच विषयांचे तास विद्यार्थ्यांनी केले पाहिजेत. व तेच विषय परीक्षेत घेतले पाहीजेत.

### ५.२ रोख फी भरण्यासबधी सूचना :

अ) बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम./बी.एम.एस. ई–कॉम/बी.बी.ए./बी.सी.ए. आणि एम.ए./एम.एस्सी./एम.कॉम. या वर्गाची फी महाविद्यालयात कार्यालयात कॅशियरकडेच रोख भरावयाची आहे.

ब) इबीसी/एफइपीटी/एसएसटीसी/बीसी/एससी/एसटी/व्हीजेएनटी ह्या योजनेखाली शिक्षण घेणाऱ्यांनी माहितीपत्रकात दर्शविलेलीच फी भरावी. नंतर दुसऱ्या सत्रात फी भरण्याची आवश्यकता नाही. **<u>सवलत मंजूरी येण्यापूर्वी महाविद्यालय सोडल्यास संपूर्ण फी भरावी लागेल.</u>**

क) संपूर्ण फी भरल्यावरच प्रवेश निश्चित समजला जात असल्याने ती पूर्णत: एकदाच भरावी. एकदा भरलेली फी प्रवेशापासून ३० दिवसानंतर परत केली जाणार नाही. महाविद्यालयात नाव दाखल केल्यानंतर सत्र (टर्म) संपण्यापूर्वी केव्हाही महाविद्यालय सोडले तरी नियमानुसार संपूर्ण फी भरावी लागेल.

ड) **सवलती खालील प्रवेशांकरीता–फी सवलत मंजुरी येण्यापूर्वी काही अपरिहार्य कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास पेईंग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या नियमांनुसार फी भरावी लागेल.**

### ५.३ फी ची रक्कम परत मिळण्याबाबत सूचना :

विद्यापीठ परिपत्रक १२६/२००३ नुसार विद्यार्थ्याने महाविद्यालयातील प्रवेश रद्द केल्यास खालीलप्रमाणे परतावा देण्यात येईल.

**१) पदवी वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी–** (FY/SY/TY - BA, B.Com, B.Sc., BBA, BCA, BMS-ecom)

अ) प्रवेश घेतल्याचे दिनांकापासून १५ दिवसपर्यंत प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थ्यास संपूर्ण रक्कम परत करण्यात येते.

ब) प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून १५ ते ३० दिवस या कालावधीत प्रवेश रद्द केल्यास इतर शुल्कातून २०% कमी करून उर्वरीत रक्कम विद्यार्थ्यास परत केली जाईल.

क) प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून ३० दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास कोणत्याही प्रकारची रक्कम परत मिळणार नाही.

**२) पदव्युत्तर वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी** (M.A., M.Com., M.Sc., I & II)

अ) प्रवेश घेतल्याचे दिनांकापासून ७ दिवसांपर्यंत प्रवेश रद्द केल्यास शिक्षण शुल्काच्या रक्कमेपैकी १०% रक्कम + रु ५००/– कमी करून उर्वरीत रक्कम विद्यार्थ्यास परत केली जाईल.

ब) प्रवेश घेतल्याचे दिनांकापासून १५ दिवसांपर्यंत प्रवेश रद्द केल्यास शिक्षण शुल्काच्या रक्कमेपैकी २५% रक्कम + रु ५००/– कमी करून उर्वरीत रक्कम विद्यार्थ्यास परत केली जाईल.

क) प्रवेश घेतल्याचे दिनांकापासून १५ दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास कोणतीही फी परत केली जाणार नाही.

### ५.४ अनामत रक्कम (डिपॉझीट) परत मिळण्यासंबंधी माहिती :

महाविद्यालयात भरलेल्या अनामत रक्कम महाविद्यालय सोडल्यानंतर पुढील वर्षी १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या मुदतीतच परत केल्या जातील. त्यासाठी अनामत रक्कम भरलेली फी पावती हजर करणे आवश्यक आहे. अनामत रकमेपैकी रु. ५/- विद्यार्थी सहाय्यक मंडळासाठी देणगी म्हणून जमा करण्यात येईल. त्याचप्रमाणे ग्रंथालयासाठी भरलेली अनामत रक्कमही महाविद्यालय सोडल्यानंतर तीन वर्षाचे आत परत घेतली पाहिजे. ही रक्कम वरील मुदतीत परत न घेतल्यास ती महाविद्यालयात खाती देणगी जमा करण्यात येईल.

**(डिपॉझीट ची रक्कम महाविद्यालय सोडतांना (T.C.) काढतांना मागणी नुसार दिली जाईल.
त्यासाठी लागणारे प्रथम वर्षातील प्रवेश फी ची पावती असणे आवश्यक आहे.)**

## ५.५ ओळखपत्र (आयडेंटीटी कार्ड) :

१) महाविद्यालयात फी भरुन प्रवेश निश्चित झाल्यानंतर प्रत्येकाने सहा दिवसांचे आत ग्रंथालयातून ओळखपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे.ओळखपत्र मिळण्यासाठीचा छापील अर्ज काढून घ्यावा. हा अर्ज पूर्णपणे भरुन त्यावर स्वत:चा अलीकडचा स्टॅम्प साईजचा फोटो लावावा. अर्जासोबत ओळखपत्रावर लावणेसाठीही एक जादा स्टॅम्प साईजचा फोटो ग्रंथालयात द्यावा प्रवेशासाठी फी भरल्याची मूळ पावती ओळखपत्रासाठी ग्रंथालयात दाखविणे आवश्यक आहे. आवश्यक त्या नोंदी करुन ग्रंथालयातून ओळखपत्र मिळेल. यासाठी विद्यार्थ्याने स्वत: हजर राहाणे आवश्यक आहे. ओळपत्रावर आपल्या रक्तगटाची नोंद करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने ओळखपत्रावर आपली सही करावी तसेच संबंधित अधिकाऱ्याची सही घ्यावी.

२) सहा दिवसांचे आत ओळखपत्र न काढल्यास दर दिवसाला रू.१ /- इतका दंड भरावा लागेल. पंधरा दिवसानंतर मात्र रु. २५ /- दंड लागेल.

३) विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र महाविद्यालयात येता जातांना, आवारात वावरतांना, तासांचे वेळी, प्रयोगशाळेत, ग्रंथालयाचा वापर करतांना, परीक्षेत बसतांना इ.वेळी स्वतः जवळ बाळगणे आवश्यक आहे.

४) ओळखपत्र शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्याने विशिष्ट कारणासाठी पहावयास मागितल्यास विद्यार्थ्याने ते दाखविले पाहिजे.

५) ओळखपत्र हरविल्यास अगर त्याचा गैरवापर झाल्यास त्याची संपूर्णपणे जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील. ओळखपत्र हरविल्यास नवीन ओळखपत्रासाठी अर्ज करुन प्राचार्यांची परवानगीसाठी सही घेवून व रु.२५/- भरुन ग्रंथालयातून तयार करून मिळेल.

६) नापास झालेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या वेळी उपयोगासाठी ओळपत्र राखून ठेवणे आवश्यक आहे.

७) ओळखपत्र लावलेला फोटो कोणत्याही परिस्थितीत परस्पर बदलवू नये अथवा कोणत्याही मजकुरात खाडाखोड करु नये. असे झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर राहील.

८) एकदा ओळखपत्र काढल्यानंतर नव्याने लागलेला चष्मा, बदलेली केशरचना इत्यादी कारणांसाठी चेहऱ्यात बदल झालेल्या असल्यास असे बदल स्पष्ट दिसतील असा फोटो लावलेले नवीन ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.

# ६. विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधीचे नियम

१. महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या सूचना विद्यार्थ्याने वाचल्या पाहिजेत त्यासाठी रोज सूचनाफलक पाहण्याची सवय ठेवावी. संबंधीत सूचना (Notice) पाहिली नव्हती अशी सबब केव्हाही चालणार नाही.

२. महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र काढलेच पाहिजे व ते नेहमी जवळ बाळगले पाहिजे.

३. ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यास महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही.

४. प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व विषयांच्या तासांना नियमितपणे व वक्तशीरपणे उपस्थित राहिले पाहिजे. विद्यापीठ व शासकीय नियमांनुसार ठराविक हजेरी असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची गैरहजेरी ही बेशिस्तीच्या प्रकारात गणली जाईल आणि या संदर्भात दंडात्मक अथवा अन्य योग्य ती कारवाई करण्यात येईल.

५. एखाद्या विद्यार्थ्याने एकाच वर्गात पुनर्प्रवेश घेतला असल्यास किंवा एखाद्यावर्षाचा खंड पडल्यानंतर नव्या वर्गात प्रवेश घेतला असल्यास अशा विद्यार्थ्याने त्या-त्यावेळी त्यांना लागू असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती ठेवावी. या संदर्भात सर्व जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील.

६. विद्यार्थ्याने आपल्या स्वत:च्या तासाखेरीज अन्य वर्गाच्या अथवा अन्य विषयांच्या तासांना संबंधित प्राध्यापकांच्या व आवश्यक तेथे प्राचार्यांच्या परवानगीशिवाय बसू नये.

७. विद्यार्थी, विद्यार्थीनीस महाविद्यालयास कोणी त्रास देत असल्यास त्यासंबंधीची सूचना/माहिती कार्यालयात समक्ष अगर प्राध्यापक किंवा कर्मचारी यांच्यामार्फत प्राचार्य/उपप्राचार्य यांच्याकडे द्यावी. वाद/भांडणे परस्पर किंवा अयोग्य मार्गांनी सोडवू नयेत. तसेच त्यासाठी बाहेरच्या व्यक्तींना परवानगीशिवाय महाविद्यालयात आणू नये.

८. चालू असलेल्या वर्गात आपल्या वागण्याने कुठल्याही तऱ्हेचा उपद्रव होणार नाही अशी खबरदारी विद्यार्थ्याने घेतली पाहिजे.

९. विद्यार्थ्याने प्रत्येक विषयाचे स्वाध्याय (Tutorial) व जर्नल्स वेळच्यावेळी लिहून पूर्ण केले पाहिजेत. त्याचप्रमाणे आपापल्या प्रात्यक्षिक प्रयोगांना हजर राहून नोंदवहीत वेळच्या वेळी लिहून पूर्ण केली पाहिजेत.

१०. महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षांना बसून विद्यार्थ्याने प्रत्येक विषयात समाधानकारक प्रगती दाखविली पाहिजे.

११. विद्यार्थ्याचा पोशाख शिष्टमान्य व नीटनेटका असावा.

१२. महाविद्यालयात असलेल्या विद्यार्थी संघटनेच्या प्रमुखाने आपल्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची नांवे वर्ग व रोल नंबरसहित कार्यालयात देणे आवश्यक आहे. त्यात झालेले बदलही त्वरित कळवावे. विद्यार्थी संघटनांनी महाविद्यालयात परस्पर कोणतीही कार्यवाही करु नये. सर्व बाबतीत प्राचार्य/उपप्राचार्य यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३. महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या बाहेर कोठेही विद्यार्थ्याचे वर्तन सभ्यतेचे असावे.

१४. सायकलीवरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या अधिकृत सायकल स्टँडवरच सायकली ठेवाव्यात. अन्यत्र ठेवलेल्या सायकली/वाहने यांस विद्यार्थी जबाबदार राहतील.

१५. विद्यापीठ परिनियमानुसार व महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार प्राध्यापकांना खाजगी शिकवण्या करता येत नाहीत. त्यामुळे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अशा खाजगी शिकवण्यांना जाता येणार नाही. मात्र आवश्यकतेनुसार महाविद्यालयात मार्गदर्शनपर वर्गाची सोय उपलब्ध करण्यात येईल.

१६. विद्यार्थी माहिती पत्रक अतिशय महत्त्वाचे आहे. हे माहितीपत्रक हरविल्यास विद्यार्थ्याने रु. ३०/- भरुन नवीन माहिती पत्रक घ्यावे लागेल.

१७. विद्यापीठ अध्यादेशानुसार ह्या माहितीपत्रकात इतरत्र दिलेले नियम, कार्यवाहीची पद्धत व कार्यवाही विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. विद्यापीठ अध्यादेशाची माहिती विद्यार्थ्यांनी करुन घेणे अनिवार्य आहे.

१८. महाविद्यालयाने तयार केलेल्या सूचना, नियम व त्या नियमात वेळोवेळी केलेल्या दुरुस्त्याही विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील. ह्या माहितीपत्रकात सर्वसाधारण माहिती दिलेली आहे. एखाद्या परिपत्रकात आलेली संपूर्ण माहिती सर्व अटींसह देतो येणे शक्य नसते. त्यामुळे संबंधित पत्रकानुसार संपूर्ण माहिती मिळविणे आवश्यक आहे. पूर्वीच्या परिपत्रकांना आलेल्या दुरुस्त्याबाबतही माहिती घेणे आवश्यक आहे. तशा सूचना वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येतात.

१९. रॅगिंग करणे हा दखलपात्र गुन्हा आहे. प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रॅगिंग होईल अशा वर्तवणूकीची गंभीरपणे दखल घेतली जाईल. आणि संबंधित विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

२०. एखाद्या विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी तक्रार आल्यास त्या संदर्भात शिस्त समितीने आणि प्राचार्यांनी घेतलेला निर्णय अंतिम आणि सर्वांवर बंधनकारक असेल.

२१. महाविद्यालयाच्या परिसरात, तासिकांना, परीक्षेला मोबाईल आणू नये. विद्यार्थ्याजवळ मोबाईल आढळल्यास जप्त केला जाईल व दंड आकारण्यात येईल.

## ७. ग्रंथालय माहिती व नियम

१. महाविद्यालयाचे ग्रंथालय सुटीच्या दिवसाखेरीज सकाळी ८ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत उघडे राहील.

२. कोणत्याही विद्यार्थ्याला ओळखपत्राशिवाय ग्रंथालयाचा उपयोग घेता येणार नाही.

३. घरी नेण्यासाठी लागणारी पुस्तके ग्रंथालयाच्या वेळापत्रकाप्रमाणे मिळतील. हे वेळापत्रक नोटीस बोर्डावर लावण्यात येते.

४. पुस्तकाचे मागणीपत्रक व्यवस्थित आणि पूर्ण लिहिले असेल तरच विद्यार्थ्याला पुस्तक मिळेल. अपूर्ण मागणी पत्राचा विचार होणार नाही.

५. एका वेळी फक्त एकच पुस्तक मिळेल. पुस्तक दिलेल्या तारखेला विद्यार्थ्याने परत केलेच पाहिजे. पुस्तक जमा करण्यास विलंब झाल्यास प्रति दिवशी रू. १/- दंड द्यावा लागेल. ग्रंथालयात वर्गातील विद्यार्थी संख्येऐवढी क्रमिक पुस्तके ठेवणे अपेक्षित नाही व अनुदानाच्या नियमानुसार शक्यही नसते. परंतु योग्य तेवढ्या पुस्तकांची व्यवस्थाकरण्याचा प्रयत्न केला जातो. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त पुस्तकांचा फायदा घेता यावा हा महाविद्यालयाचा प्रयत्न असतो. त्यासाठी विद्यार्थ्याने ठरवून दिलेल्या वेळेत पुस्तक परत करणे आवश्यक असते. दुसऱ्या गरजू विद्यार्थ्यास ते मिळावे म्हणून नाईलाजाने विलंब शुल्क ठेवून ते विद्यार्थ्यांकडून लवकर जमा करुन घ्यावे लागते. विद्यार्थ्यांनी अत्यंत आवश्यक अशी क्रमिक पुस्तके स्वत: विकत घ्यावीत. इतर संदर्भ पुस्तके ग्रंथालयातून मागणीपत्र देवून घ्यावीत.

६. ग्रंथालयाचे काही येणे नसल्याबद्दल प्रमाणपत्र १५ मार्चचे आत घेतले पाहिजे. वार्षिक परीक्षेचे काळात पुस्तक पाहिजे असल्यास पुस्तकाच्या किंमतीचे दीडपट रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल. पुस्तके नियमानुसार ग्रंथालयात जमा न झाल्यास विद्यार्थ्याचे मार्कशीट व महाविद्यालय सोडल्याचा दाखला मिळणार नाही.

७. पुस्तक हरविले असल्यास त्याची माहिती ग्रंथपाल यांना दोन दिवसाचे आत दिली पाहिजे व हरविलेल्या पुस्तकाची किंमत ग्रंथालय नियमाप्रमाणे १५ दिवसाचे आत भरली पाहिजे या परिस्थितीतसुद्धा विलंब शुल्क प्रति दिवशी रू.१/- द्यावे लागेल.

८. मागणीपत्रावर मिळणारी पुस्तके चांगल्या अवस्थेत आहेत याची खात्री पुस्तके ताब्यात घेण्यापूर्वी करुन घ्यावी. पुस्तक फाटके किंवा अपुरे असल्याबद्दलची तक्रार मागाहून ऐकण्यात येणार नाही. पुस्तक फाडून आणल्यास त्याची पूर्ण रक्कम वसूल केली जाईल व सदर पुस्तक ग्रंथालयात जमा करावे लागेल.

९. पुस्तक पेढीस पुस्तके गरीब आणि होतकरु विद्यार्थ्यांना मिळू शकतील.

१०. पुस्तकपेढीतील पुस्तके विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक गुणवत्तेनुसार दिली जातील.

११. संगणकशास्त्र हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ग्रंथालय अनामत रक्कम (Deposit) घेतली जाईल आणि त्या रकमेच्या अंतर्गत मर्यादेत सदर विषयाची अतिरिक्त पुस्तके पुस्तक पेढीतून उपलब्ध करुन दिली जातील. ठेवीची रक्कम परत करतांना देखभाल व इतर खर्च (Maintenance Charges) वजा करण्यात येईल.

### ✲ ग्रंथालयाच्या वाचनकक्ष विभागाचे नियम :

१. वाचनकक्ष विभागात प्रवेश करतांना विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र आणि वाचकपत्र असणे आवश्यक आहे.

२. आपले ओळखपत्र व वाचकपत्र इतरांना देऊ नये.

३. वाचनकक्ष विभागात ठेवलेले ग्रंथ कोणत्याही कारणास्तव वाचनकक्षाबाहेर नेता येणार नाहीत. तसे आढळल्यास रु.११/- दंड भरावा लागेल. शिवाय अशा विद्यार्थ्यांस त्यानंतर वाचन कक्षात प्रवेश मिळणार नाही.

४. विद्यार्थ्यांनी वाचनकक्षाचा वापर अतिशय काळजीपूर्वक करावा. कक्षात नेहमी शांतता ठेवावी. मोठ्याने बोलू नये अगर धुम्रपान करु नये.

५. वाचनकक्षात ठेवलेले ग्रंथ अतिशय काळजीपूर्वक हाताळावे. त्यातील पाने फाडू नये अगर शाई वा पेन्सिलने लिहू नये. पुस्तकाची काळजी घेणे हे विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे.

६. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली पुस्तके/संदर्भ ग्रंथ स्वत: विकत घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही याचा विचार करुन ग्रंथालयाचा वाचनकक्ष विभाग सकाळी ८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत आणि सुट्टीच्या दिवशीही सुरु ठेवणेत येतो.

## ८. सत्र मंजूरीसाठी (Grant of Term) नियम

केवळ महाविद्यालयात प्रवेश घेतला व फी भरली म्हणजे सत्र मंजूर होत नाही. सत्र मंजू होण्यासाठी खालील गोष्टींचा विचार केला जातो.

१) विद्यार्थी महाविद्यालयात सर्व विषयाला, तासांना हजर राहतो. वर्षात किमान ८० टक्के उपस्थिती असणे.
२) प्रत्येक विषयासाठी नेमलेल्या स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे समाधानकारक व अभ्यासपूर्वक लिहून मदतीत पूर्ण करणे.
३) त्याची विहीत फी वेळेवर भरणे.
४) सर्व चाचणी परिक्षांना बसून समाधानकारक प्रगती दाखविणे.
५) महाविद्यालयात, वर्गात व वर्गाव्यतिरिक्त होणाऱ्या कार्यक्रमात भाग घेणे.
६) त्याचे वर्गातील व इतर कार्यक्रमाच्या वेळचे वर्तन सभ्य व शिस्तबद्ध असणे.
७) शारीरिक शिक्षणाचे तास, एन.सी.सी.परेड एन.एस.एस.यांना नियमाने हजर राहणे आणि इतर खेळात भाग घेणे.
८) वाचनालयातील पुस्तके वेळेवर परत करणे.

वरील नियमांविरूद्ध विद्यार्थ्याचे वर्तन झाल्यास त्याला योग्य ती शिक्षा होईलच. शिवाय त्याचे सत्र मंजूर केले जाणार नाही व त्यास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

## ९. परिक्षा नियम

### ९.१ परीक्षेबाबत सर्वसाधारण माहिती :

पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांना सत्र पद्धत लागु करण्यात आली आहे. विद्यापीठाने दिलेल्या मुदतीतच परिक्षाअर्ज व परिक्षा फी स्वतः भरणे आवश्यक आहे. परिक्षा संबंधिच्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करावी. प्रवेश अर्जानुसार विद्यार्थ्याने जे विषय घेतले असतील त्याच विषयाची परिक्षा देता येईल. **परिक्षा फॉर्म अचूक भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील**. परिक्षा फी भरल्यानंतर विद्यार्थ्याने नेमुन दिलेल्या कर्मचाऱ्याकडे काळजीपूर्वक जमा करावा.

ज्या विद्यार्थ्याने ह्या महाविद्यालयातून टी.सी.काढून घेतलेले आहे. अशा विद्यार्थ्यास येथून परिक्षा अर्ज भरता येणार नाही. परिक्षेत कॉपी, गुंडगिरी, बेशिस्त वर्तन गैरप्रकार इ. मध्ये शिक्षा झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देणेबाबत प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

**परिक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांना मोबाईल आणण्यास मनाई आहे. तसेच विद्यार्थ्यांजवळ आढळून आल्यास उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.**

### ९.२ अध्यादेश १६३ नुसार असलेली गुणांची तरतुद :

वार्षिक परीक्षेस बसण्यापूर्वी विविध विभागाचे विद्यार्थ्यांकडे पुस्तके, साहित्य, फी, ब्रेकेजची रक्कम, दंड इ. येणे नसल्याबद्दलचे माहिती पुस्तिकेत दिलेले प्रमाणपत्र कॅशियरकडे सादर करणे आवश्यक आहे. ऑर्डीनन्स १६३ मध्ये उल्लेख केलेल्या अभ्यासक्रमेतर कार्यक्रमात सहभाग घेतल्याबद्दल विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षा सुरु होण्याच्या आधी विहित नमुन्यात अर्ज केल्यास ५ जादा गुण दिले जातात. संबंधित विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करण्याची जबाबदारी त्यांचेवर राहील. परीक्षा निकालानंतर उत्तरपत्रिकांची छायाप्रत गुणांची फेरतपासणी/गुणांचे पुर्नमूल्यांकन ऑर्डिनन्स १३४ (अ) नुसार विशिष्ट मुदतीत विद्यापीठाकडून केले जाते. त्यासाठी विद्यार्थ्याने मुदतीत अर्ज करावा लागतो. तसेच ग्रेसींग/condonation बाबत परीक्षा निकालानंतर विद्यापीठाकडे निकाल, दुरुस्ती, तक्रार, विनंती अर्ज इ. ऑर्डीनन्स १३५ ते १४५ नुसार करता येतात.

**१) अंतर्गत परिक्षा :** विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे शाखानिहाय वेळापत्रकानुसार महाविद्यालयामार्फत अंतर्गत परीक्षा घेण्यात येतात.

**१)** महाविद्यालयामार्फत होणाऱ्या अंतर्गत लेखी परीक्षांसाठी महाविद्यालयामार्फत प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु.६०/- परीक्षा फी म्हणुन घेण्यात येईल.

२) गुणांची विगतवारी खालीलप्रमाणे राहील.

ज्या विषयात विद्यार्थी उत्तीर्ण असेल त्याच विषयाचे ग्रेड पॉईंटचा विचार पुढील निकाल जाहीर करतांना केला जात असतो. ज्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण आहेत त्या विषयाला F ग्रेड आहे, त्यासाठी ०० ग्रेड पॉईंट देण्यात येतात. प्रथम वर्ष बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम. व एम.ए./एम.एस्सी./एम.कॉम. या वर्गाचे पासींग ४०% चे असल्याने बहि:स्थ (U.A.) परीक्षेत ४०% पेक्षा कमी गुण असल्यास विद्यार्थ्याला F ग्रेड देण्यात येते. तसेच अंतर्गत गुण (C.A.)+ बहि:स्थ परीक्षेचे गुण (U.A.) यांची बेरीज ४०% पेक्षा कमी असल्यास देखील विद्यार्थ्याला F ग्रेड देण्यात येते. F ग्रेडसाठी ग्रेड पॉईंट (Earned Grade Point) ०० दिसतात. ०० ग्रेड पॉईंट याचा अर्थ विद्यार्थ्याला ०० गुण मिळाले असा होत नाही. तर तो विषय विद्यार्थ्याला परत द्यायचा आहे असा होतो. विद्यार्थ्याला F ग्रेड मिळालेल्या विषयांची फक्त बहि:स्थ परीक्षा (U.A.) परत द्याव्या लागणार आहेत. एखाद्या विद्यार्थ्याला C.A. मध्ये ०० गुण असतील व U.A.+C.A. ही बेरीज ४०% पेक्षा जास्त होत असेल तरी विद्यार्थी उत्तीर्ण होतो.

३) **कला विद्याशाखेअंतर्गत :** संगीत व संगणक यांचे ५० गुण थेअरी व ५० गुणांचे प्रात्यक्षिक याचे विभाजन थेअरीसाठी ४० गुण (वार्षिक परीक्षेसाठी) व १० गुण अंतर्गत परीक्षेसाठी असतील. तसेच प्रात्यक्षिकांसाठी ४० गुण (वार्षिक प्रात्यक्षिक परीक्षेसाठी) व १० गुण अंतर्गत असतील. अंतर्गत गुणांचे विभाजन वरील नियम क्र. २ प्रमाणेच्या गुणोत्तरात राहील.

९.३ (१) ATKT चे नियम विद्यापीठ परीपत्रकानुसार खालील प्रमाणे असतील.

अ) प्रथम वर्ष कला व वाणिज्य या वर्गासाठी दोन्ही सत्र मिळून जास्तीत जास्त कुठल्याही ४ विषयात अनुत्तीर्ण असणारा विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेश घेण्यास पात्र राहील.

ब) प्रथम वर्ष विज्ञान या वर्गासाठी दोन्ही सत्र मिळून जास्तीत जास्त ५ लेखी विषय व १ प्रात्यक्षिक विषयात अनुत्तीर्ण असणारा विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेश घेण्यास पात्र राहील.

(२) अध्यादेश १, ४ व १६३ फक्त बहिस्थ ८० गुणांच्या पेपरसाठी लागू राहील.

(३) अंतर्गत परिक्षेचे (यु.जी.करीता) (पी.जी.करीता) गुण विद्यापीठात सादर करण्यापुर्वी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येतील. ज्या विद्यार्थ्यांना आपल्या अंतर्गत गुणात सुधारणा करण्यासाठी पुनर्परिक्षेची इच्छा असल्यास एक संधी देवुन पुन:परिक्षा घेण्यात येईल.

# १०. पारितोषिके

- **श्री. व्यंकटेश दामोदर काळवीट, हेडमास्तर पारितोषिक -देणगीदार श्री. व्यंकटेश दामोदर काळवीट**
  ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न इ.बी.सी. मर्यादेच्या आत आहे आणि जो विद्यार्थी विद्यापीठाच्या बी.ए. परीक्षेत मराठी (स्पेशल) हा विषय घेवून जास्तीत जास्त गुणांनी उत्तीर्ण होईल अशा विद्यार्थ्यास देण्यात येते.

- **दि भुसावळ पीपल्स को-ऑपरेटीव्ह बँक लि. पारितोषिक : देणगीदार दि भुसावळ पिपल्स को-ऑप बँक लि. भुसावळ**
  अ) महाविद्यालयातील जो विद्यार्थी विद्यापीठाच्या टी.वाय.बी.कॉम. परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होईल त्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.
  ब) महाविद्यालयातील जो विद्यार्थी विद्यापीठाच्या टी.वाय.बी.ए. परीक्षेत अर्थशास्त्र विषयात जास्तीत जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होईल त्या विद्यार्थ्यास रोख पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. जयकुंवरबाई पुनमचंद नाहाटा पारितोषिक: देणगीदार पुनमचंद ओंकार नाहाटा ट्रस्ट भुसावळ**
  पुनमचंद ओंकारदास नाहाटा ट्रस्टतर्फे परीक्षेत या महाविद्यालयातून खालील वर्गातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रत्येकी पारितोषिक देण्यात येते.
  १) एम.कॉम. परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्यास
  २) तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्यास
  ३) द्वितीय वर्ष वाणिज्य परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्यास

- **स्व. मो. वा. केळकर पारितोषिक : देणगीदार - श्री. म. मो. केळकर, जळगाव.**
  हे पारितोषिक विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून खालील वर्गातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यात येते.
  १) एफ.वाय.बी.एस्सी. च्या परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.
  २) बी.ए. परीक्षेत संस्कृत विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. मामासाहेब बी.आर. कुलकर्णी पारितोषिक : देणगीदार १) विजय भगवंतराव वडगावकर २) संजय भगवंतराव वडगावकर रा. भुसावळ**
  हे पारितोषिक विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास खालीलप्रमाणे पारितोषिक देण्यात येते.
  १) तृतीय वर्ष कला (जनरल) या वर्गातून सर्वप्रथम येणाऱ्यास
  २) तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातून सर्वप्रथम येणाऱ्यास
  ३) तृतीय वर्ष विज्ञान (गणित) या वर्गातून सर्वप्रथम येणाऱ्यास
  ४) तृतीय वर्ष विज्ञान (भौतिक) या वर्गातून सर्वप्रथम येणाऱ्यास

- **स्व. काशिनाथ दलपत कोल्हे पारितोषिक : देणगीदार - श्री. बी. के. कोल्हे, जळगाव**
  विद्यापीठाच्या टी.वाय.बी.कॉम. परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. चंद्रकलाबाई के. नारखेडे पारितोषिक :देणगीदार श्री. एन. के. नारखेडे**
  विद्यापीठाच्या एस.वाय.बी.ए. ला मराठी (जनरल) विषयात सर्वात जास्त गुण मिळवून टी.वाय.बी.ए. ला मराठी (स्पेशल) विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **अच्युत धनाजी चौधरी पारितोषिक : देणगीदार - श्री. ओ. पी. पाटील, भुसावळ**
  टी.वाय.बी.एस्सी. परीक्षेत इलेक्ट्रॉनिक्स या विषयात महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **सौ. राधाबाई अच्युत चौधरी पारितोषिक : देणगीदार – श्री. ओ. पी. पाटील, भुसावळ**
  टी.वाय.बी.एस्सी. परीक्षेत कॉम्प्युटर सायन्स या विषयात महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीस पारितोषिक देण्यात येते.

- **श्री. एच. एन. राव पारितोषिक: देणगीदार– श्री. एच. एन. एस. राव, भुसावळ**
  अ) टी.वाय.बी.ए. इंग्रजी (स्पेशल) मध्ये सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते
  ब) टी.वाय.बी.ए. मराठी (स्पेशल) मध्ये सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यासपारितोषिक देण्यात येते
  क) टी.वाय.बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स मध्ये सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यासपारितोषिक देण्यात येते
  ड) टी.वाय.बी.ए. च्या वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते

- **राजगोपालन पारितोषिक : देणगीदार – कु. उमा राजगोपालन, भुसावळ**
  टी.वाय.बी.एस्सी. फिजीक्स मध्ये सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **सौ. उषा सखाराम साठे संगीत पारितोषिक : देणगीदार – श्री. ॲड. स. म. साठे**
  तृतीय वर्ष संगीत या विषयात विद्यापीठ परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. रामभाऊ हंबर्डीकर परितोषिक : देणगीदार – श्री. पी.आर पाटील, भुसावळ**
  रसायनशास्त्र विषय घेवून टी. वाय् बी.एस्सीच्या वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमाकांने उत्तिर्णी होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. सीताबाई हंबर्डीकर पारितोषिक : देणगीदार – श्री. पी. आर. पाटील, भुसावळ**
  इलेक्ट्रॉनिक्स किंवा कॉम्प्युटर सायन्स हे विषय घेवून टी.वाय.बी.एस्सी. च्या वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. शामलाल ताराचंद मिलवाणी पारितोषिक : देणगीदार – मे. शामा फायर वर्क्स, जळगांव.**
  जिमखाना विभागात विद्यापीठ स्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय पातळीवर सर्वोत्कृष्ठ ठरणाऱ्या खेळाडूस पारितोषिक व स्मृतिचिन्ह देण्यात येते.

- **स्व. प्रा. पी. एस. पाटील पारितोषिक : देणगीदार : श्रीमती सुमन पी.पाटील, भुसावळ**
  बी.ए. या वर्गात इतिहास (स्पेशल) हा विषय घेऊन विद्यापीठ परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यासय पारितोषिके देण्यात येते.

- **स्व. हरी रावजी टोके गुरुजी पारितोषिक : देणगीदार – प्रा. एम. एच. टोके, भुसावळ**
  तृतीय वर्ष बी.एस्सी. ह्या वर्गात गणित (स्पेशल) घेऊन विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **सौ. शकुंतला मधुकर पाठक पारितोषिक : देणगीदार – प्रा. डॉ. एम. एस. पाठक**
  एम. ए. ह्या वर्गात मराठी स्पेशल घेऊन विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. सौ. चंद्रभागाबाई गोविंदराव फालक स्मृती पारितोषिक : देणगीदार श्री. देविदास गोविंद फालक, भुसावळ**
  टी.वाय.बी.ए. या वर्गात राज्यशास्त्र (स्पेशल) हा विषय घेऊन विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. सी. वाय. कोल्हे स्मृती पारितोषिक :** देणगीदार - प्राचार्य डॉ. व्ही. सी. कोल्हे, भुसावळ
  एम.एस्सी. केमेस्ट्री घेऊन विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. सौ. विजया रघुनाथ पाटणकर स्मृती पारितोषिक : देणगीदार – प्रा. डॉ. व्ही. आर. पाटणकर, भुसावळ**

  अ) टी.वाय.बी.एस्सी. ह्या वर्गात वनस्पतीशास्त्र (स्पेशल) विषय घेऊन विद्यापीठ परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिास पारितोषिक देण्यात येते.

  ब) टी.वाय.बी.ए. (हिंदी) घेऊन विद्यापीठ परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. कु. मनिषा जगन्नाथ भंगाळे पारितोषिक : देणगीदार – श्री. जगन्ननाथ शामराव भंगाळे, भुसावळ**

  टी.वाय.बी.एस्सी. ह्या वर्गात रसायनशास्त्र (स्पेशल) विषय घेऊन विद्यापीठ परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस पारितोषिक देण्यात येते.

- **प्रा. जे. व्ही. चौधरी पारितोषिक : देणगीदार– श्री. निर्मल जे. चौधरी, यू.एस.ए.**

  अ) टी.वाय.बी.एस्सी. या वर्गात संगणकशास्त्र (विशेषस्तर) हा विषय घेवून विद्यापीठ परीक्षेत विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात येते.

  ब) टी.वाय.बी.एस्सी. या वर्गात संगणकशास्त्र (विशेषस्तर) हा विषय घेवून विद्यापीठ परीक्षेत विद्यार्थीनीमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीनीस पारितोषिक देण्यात येते.

- **स्व. कु. मनिषा बाळासाहेब जाधव पारितोषिक : देणगीदार – श्री. बाळासाहेब दौलतराम जाधव**

  एम्.कॉम्. अभ्यासक्रमास महाविद्यालयापासून सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनिस पारितोषिक देण्यात येते.

परीक्षेत चांगले यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास उत्तेजन देण्याच्या हेतूने महाविद्यालयाकडून बक्षिसे व शिष्यवृत्त्या देण्यात येतील. शालांत परीक्षेत शे.८० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या आणि विद्यापीठाच्या परीक्षेत ६० टक्के पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या क्रमानुसार शिष्यवृत्त्या दिल्या जातील आणि अभ्यासू व गरीब विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत देण्यात येईल.